**महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना**

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा. नि. क्र. शिष्यवृ-2008/(254/08)/मशि -6,<br>दि. 22 जानेवारी, 2009 |
| 3 | योजनेचा स्वरूप | केंद्रशासनाच्या निर्देशानुसार, इ. 12 वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी महाराष्ट्र स्टेट बोर्डाकडून प्राप्त झालेल्या टॉप 20 पर्सेंटाईल यादीमध्ये ज्या विद्यार्थ्यांची नावे समाविष्ट आहेत, अशा विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो.<br>सदर योजना 100 टक्के केंद्रपुरस्कृत असून, महाराष्ट्र राज्यासाठी 7417 संच निर्धारित केले आहेत. त्यापैकी अनुसुचित जातीसाठी 15 टक्के, अनुसुचित जमातीसाठी 7.5 टक्के , इतर मागासवर्गीयांसाठी 27 टक्के आणि शारिरीकदृष्टया अपगांसाठी 5 टक्के राखीव आहेत. |
| 4 | योजनेचा उद्देश | गुणवान विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. सदर योजनेसाठी टॉप 20 पर्सेंटाईल यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्तीच्या नवीन मंजूरीस्तव (Fresh) अर्ज भरता येईल.<br>२. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.<br>४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. 8.00 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>५. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने मागील वर्षी 50 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>६. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे.<br>७. विद्यार्थ्यांने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे आश्यक आहे. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.<br>२. सक्षम प्राधिकरणाने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.<br>३. सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र.<br>४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप | पदवी स्तर (3 वर्ष ) साठी - प्रतिपर्ष 10,000/-<br>पदव्युत्तर पदवी ( 2 वर्ष ) साठी - प्रतिवर्ष 20,000/-<br>सदर रक्कम ही मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचेतर्फे विद्यार्थ्याचे थेट बँक खातेवर {DBT} जमा करण्यात येते. |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.scholarships.gov.in |